सकाळ दि 11/04/2023

# हॉस्टेलवर दरोडा टाकणाऱ्या टोळीतील चार जणांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नांदेड, ता. १० (बातमीदार) : एका हॉस्टेलवर दरोडा टाकून त्यांना मारहाण करणाऱ्या एका टोळीतील चार जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. याबाबत भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात ला होता. आणखी तीन साथीदारांचा शोध सुरू आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या पथकाने कार्यवाही केली. हॉस्टेलवर दरोडा टाकणारे गुन्हेगार हे कांदे मामा हॉटेलच्या मागे असलेल्या खोलीमध्ये लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारून चौघांना ताब्यात घेतले. त्यानंतर विचारपूस केली असता सात जणांनी मिळून गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. त्यानुसार अंकुश दीपक पंडीत (वय २३, रा. नेरली), सुरज अर्जुन शिंदे (वय २२, रा. कांदेमामा यांची बिल्डीग, तरोडा नाका), सुरज महेंद्र हिंगोले (वय २२, रा. कासारखेडा) आणि निखील रमेश घोरपडे (वय १८, रा. वसरणी) या चौघांना अटक केली आहे. त्याचबरोबर त्यांचे साथीदार अक्रांत अशोक खंडाखुळे (रा. नेरली), गौतम सखाराम हटकर (रा. नेरली) आणि जसपालसिंघ दिवाणसिंग संधू (रा. शहीदपुरा, नांदेड) हे तिघे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

या चार आरोपींकडून एक लोखंडी खंजर, एक लोखंडी तलवार, गुन्ह्यात चोरलेला आठ हजाराचा मोबाईल आणि तीन हजार रुपये रोख असा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी आरोपींना भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरील कारवाई पथकातील फौजदार गोविंद मुंडे, जसवंतसिंघ शाहू, दत्तात्रय काळे, पोलिस जमादार सखाराम नवघरे, रूपेश दासरवार, शंकर म्हैसनवाड, पोलिस नायक दीपक पवार, चालक शंकर केंद्रे, गंगाधर घुगे यांनी केली आहे.



**नांदेड : हॉस्टेलवर दरोडा टाकणाऱ्या चार जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्यासह अधिकारी व पोलिस.**